**तापमान**
दिवस : 32° उच्च
रात्र : 10° किमान
सूर्योदय : ११ तास २४ मिनिटे
उगवणे :07:07 AM
मावळणे :06:31 PM
सूर्यास्त : ११ तास ५० मिनिटे
उगवणे : 10:36 PM
मावळणे : 10:26 AM

LIVE
24k सोने प्रति १० ग्रॅम
रू.१,५६,६००/-
22k सोने प्रति १० ग्रॅम
रू. १,४३,५५०/-
चांदी प्रति किलो
रू. २,८५,०००/-
डॉलर प्रति दर
रू.९१.५१

# दैनिक चालु वार्ता

**पुणे-मुंबई महामार्गावरील भीषण वास्तव आणि शिरूर-कर्जत समांतर महामार्गाची तातडीची गरज**
(बातमी.... पान क्रमांक २ वर )

✻ पुणे ✻ वर्ष : ५ ✻ मुख्य संपादक : डि.एस.लोखंडे पाटील ✻ अंक : १९३ ✻ सोमवार दि.०९ फेब्रुवारी २०२६ ✻ पाने : ०४ ✻ किंमत रु.३ ✻ RNI No.: MAHMAR/2021/82895
✻ Chief Editor : D.S.Lokhande Patil ✻ Pune ✻ Vol 5 ✻ Issue 193 ✻ Monday ✻ 09 February 2026 ✻ Pages 04 ✻ Price Rs.3 ✻ RNI No.: MAHMAR/2021/82895 ✻ E-mail : dainikchaluwartha@gmail.com
✻ पुणे ✻ नांदेड ✻ छ.संभाजीनगर ✻ बीड ✻ परभणी ✻ हिंगोली ✻ जालना ✻ लातूर ✻ धाराशिव ✻ मुंबई ✻ पालघर ✻ ठाणे ✻ रायगड ✻ रत्नागिरी ✻ अहमदनगर ✻ सोलापूर ✻ सातारा ✻ सांगली ✻ अमरावती ✻ यवतमाळ ✻ वर्धा ✻ वाशिम ✻ चंद्रपूर ✻

## देश विदेश थोडक्यात

### भारत-पाकिस्तान 'क्रिकेट' वादात बांगलादेशची एन्ट्री;
### ICC विरुद्ध पाकिस्तान संघर्षाला नवे वळण!



**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**

**मुंबई :** २०२६ च्या टी-२० विश्वचषकातील भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामन्यावरून निर्माण झालेला पेच आता आणखी गडद झाला आहे. पाकिस्तानने १५ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या भारताविरुद्धच्या सामन्यावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतल्याने स्पर्धेला नाट्यमय वळण मिळाले असतानाच, आता बांगलादेशने या वादात उडी घेतल्याने प्रकरणाला नवी धार आली आहे.

**नेमका वाद काय?**

या वादाची ठिणगी बांगलादेश क्रिकेट बोर्डाच्या (BCB) भूमिकेमुळे पडली. बांगलादेशच्या अंतरिम सरकारने सुरक्षा कारणांचा हवाला देत आपल्या संघाला भारतामध्ये खेळण्यास पाठवण्यास नकार दिला होता. बांगलादेशने आपले सामने सह-यजमान श्रीलंकेत हलवण्याची विनंती 'आयसीसी'ला (ICC) केली होती. मात्र, स्वतंत्र सुरक्षा यंत्रणांच्या अहवालात कोणताही धोका नसल्याचे स्पष्ट झाल्याने आयसीसीने ही विनंती फेटाळून लावली. सहभागाची अंतिम मुदत उलटून गेल्याने आयसीसीने बांगलादेशला स्पर्धेतून बाहेर काढून त्यांच्या जागी 'ग्रुप सी'मध्ये स्कॉटलंडचा समावेश केला.

**पाकिस्तानचा बांगलादेशला पाठिंबा आणि बहिष्काराचे अस्त्र**

बांगलादेशच्या हकालपट्टीनंतर पाकिस्तान सरकारने आणि पीसीबीने बांगलादेशची पाठराखण केली. पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी राष्ट्रीय संघाला १५ फेब्रुवारी रोजी कोलंबो येथे होणाऱ्या भारताविरुद्धच्या 'हाय-व्होल्टेज' सामन्यावर बहिष्कार टाकण्याचे निर्देश दिले आहेत. पीसीबीचे अध्यक्ष मोहसिन नकवी यांनी बांगलादेशवरील कारवाईला 'अन्यायकारक' आणि 'राजकीय प्रेरित' म्हटले आहे. कोणत्याही बोर्डाला असुरक्षित वाटणाऱ्या ठिकाणी खेळण्यासाठी भाग पाडले जाऊ नये, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे.

**दोन्ही बोर्ड आयसीसीसमोर एकजूट दाखवण्याची शक्यता**

सध्याचा कोंडी फोडण्यासाठी बांगलादेश क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष अमीनुल इस्लाम बुलबुल लाहोरमध्ये दाखल झाले असून त्यांची मोहसिन नकवी यांच्याशी चर्चा सुरू आहे. या बैठकीनंतर दोन्ही देशांचे प्रतिनिधी आयसीसीच्या दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत चर्चा करणार आहेत. हे दोन्ही बोर्ड आयसीसीसमोर एकजूट दाखवण्याची शक्यता आहे.

**आयसीसीचा कडक इशारा**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद (आयसीसी) ने पाकिस्तानला या बहिष्कारामुळे होणाऱ्या परिणामांची जाणीव करून दिली आहे. जर पाकिस्तानने सामना खेळण्यास नकार दिला, तर त्यांच्यावर मोठी आर्थिक दंडात्मक कारवाई, गुण गमावणे, सदस्यत्व रद्द करणे किंवा भविष्यातील जागतिक स्पर्धांच्या यजमानपदावर गदा येणे, अशा स्वरूपाचे निर्बंध लादले जाऊ शकतात. दरम्यान, 'फोर्स मॅजेअर' (Force Majeure) कलमाचा वापर करून पाकिस्तान या सामन्यातून माघार घेण्याचा प्रयत्न करत आहे, ज्यावर आयसीसीने स्पष्टीकरण मागितले आहे. (पान ४ वर...☞ )


# ...तर तरुण नक्षलवादाकडे वळतील !

## सरसंघचालक मोहन भागवतांचं मोठं विधान; नेमकं काय म्हणाले?

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**

**मुंबई :** रिकामं डोकं सैतानाचे घर बनते, त्यामुळे हाताला काम पाहिजे. काम नसेल तर तरुण नक्षलवादाकडे वळतील', असे प्रखड मत रा.स्व. संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी व्यक्त केले. रा. स्व. संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त 'संघ प्रवासाची १०० वर्षे: नवे क्षितिज' या विषयावर सरसंघचालक मोहन भागवतांची दोन दिवसीय व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे.

या व्याख्यानमालेत त्यांनी आपले मत व्यक्त केले आहे. मान्यवरांसोबत प्रश्न-उत्तरांच्या कार्यक्रमात ते बोलत होते. एआय आणि नव्या तंत्रज्ञानामुळे रोजगार जाणार नाहीत, याची काळजी घेतली पाहिजे. तंत्रज्ञानाला नाकारायला नको. आपल्याकडे हात आहेत, त्या हातांना काम हवंय. रिकामं डोकं सैतानाचे घर बनते, त्यामुळे



हाताला काम पाहिजे. काम नसेल तर तरुण नक्षलवादाकडे वळतील.

भ्रष्टाचार आणि भाषेच्या आधारावर भेदभाव केला जात असल्याच्या प्रश्नावर देखील मोहन भागवत यांनी आपले विचार मांडले. भ्रष्टाचार दूर कसा करायचा? भाषेच्या आधारावर भेदभाव केला जात आहे तो कसा दूर करायचा? असा प्रश्न विचारण्यात आला. यावर बोलताना मोहन भागवत म्हणाले, 'भाषिक वाद मिटवयाचे असतील तर एकमेकांच्या घरी गेलं पाहिजे. सुख दु:खात सहभागी झालं पाहिजे. ज्यावेळी देशाचा विषय येईल, त्यावेळी सर्वांनी एकत्र यायला पाहिजे.' असे मत मांडले.

ते असेही म्हणाले की, भ्रष्टाचारी समोर आणायला संघ प्रयत्न करेल. भ्रष्टाचार व्यवस्थेत नाही तर मनात होत असतो. व्यवस्थेला बिघडवणारे आणि सुधरवणारे आपणच आहोत. भाषेच्या आधारावर समाजात भेदभाव नाही. काहींकडून हे होतं, असा दावा त्यांनी केला आहे.

## ज्याची भीती होती तेच घडलं !

### दोन शक्तीशाली देश थेट आमने -सामने भारताशी कनेक्शन...

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**

**मुंबई :** अमेरिकेने चीनवर पुन्हा एकदा गंभीर आरोप केले आहेत, गलवानमध्ये उफाळलेल्या संघर्षापूर्वी काही दिवस आधी चीनने सीक्रेट न्यूक्लियर टेस्ट केली होती, असा दावा अमेरिकेकडून करण्यात आला आहे, अमेरिकेच्या या आरोपानंतर आता दोन्ही देशांमधील तणाव पुन्हा एकदा वाढला आहे, अमेरिकेनं केलेल्या दाव्यावर चीनने देखील प्रतिक्रिया दिली आहे.

चीनने २२ जून २०२० साली एक सीक्रेट न्यूक्लिअर टेस्ट केली होती, ही घटना गलवानमध्ये भारत आणि चीनमध्ये झालेल्या संघर्षानंतर करण्यात आली होती, या संघर्षामध्ये भारताने आपल्या वीस सैनिकांना गामावलं, त्यानंतर चीनने २२ जून २०२० साली एक सीक्रेट न्यूक्लिअर टेस्ट केली, असा दावा अमेरिकेनं केला आहे.

अमेरिका एवढ्यावरच थांबली नाही, तर चीनने न्यूक्लिअर टेस्ट लपवण्याचा प्रयत्न केला असंही यावेळी अमेरिकेनं म्हटलं आहे. अमेरिकेचे शस्त्रास्त्र नियंत्रण आणि



आंतरराष्ट्रीय सुरक्षा विभागाचे उप-सचिव थॉमस डीनॅनो यांनी केलेल्या दाव्यामुळे खळबळ उडाली आहे. चीनने जी न्यूक्लिअर टेस्ट केली होती, त्याची माहिती अमेरिकेला होती. चीनी सैन्याने न्यूक्लिअर स्फोट लपवण्याचा प्रयत्न केला, कारण अशी टेस्ट उघडपणे करणं हे न्यूक्लिअर टेस्ट संदर्भातील आंतरराष्ट्रीय कायद्याचं उल्लंघन ठरेल हे त्यांना माहिती होतं, असा दावा थॉमस डीनॅनो यांनी केला आहे.

दरम्यान त्यानंतर आता चीनकडून देखील अमेरिकेच्या आरोपांना प्रत्युत्तर देण्यात आलं आहे. चीनचे राजदूत शेन जिआय यांनी म्हटलं आहे की, आमच्या हे आता लक्षात आलं आहे की, अमेरिका चीनपासून जगाला न्यूक्लिअरचा धोका आहे, हे सांगण्यासाठी या प्रकारचे दावे करत आहे, अमेरिकेकडून हे आमच्यावर (पान ४ वर...☞ )

## राज्यात पुन्हा वातावरण तापणार

### १७ फेब्रुवारीपासून OBC आंदोलनाचा विजय वडेट्टीवार यांचा इशारा...

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**

**मुंबई :** सकल ओबीसी मोर्चातर्फे आणि वेगवेगळ्या संघटनांचे प्रतिनिधी घेऊन आम्ही आरक्षणसाठी लढत आलेलो आहोत. जनगणना आणि यूजीसी संदर्भात ज्या गाईडलाईन्स आल्या आहेत. त्यावरुन विदर्भातील सगळ्या ओबीसी नेत्यांमध्ये चर्चा झालेली आहे.

ओबीसीची जनगणना होत नसेल तर त्याचा आरक्षणावर परीणाम होऊ शकतो. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीतही अडचणी आहेत. ओबीसी आरक्षणाचा विषय राज्यभरात आता आंदोलनाच्या माध्यमातून पुढे आणणार असल्याचे काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.

येत्या १७ तारखेला नागपूरच्या संविधान चौकामध्ये यासाठी धरणे



आंदोलन करून सुरुवात केली जाईल. जोपर्यंत ओबीसींचा जनगणनेत समावेश होत नाही. तोपर्यंत राज्यात सगळ्या नेत्यांनी मोठे आंदोलन केले पाहिजे. जिल्हा विभाग स्तरावर मोर्चे काढून ओबीसीच्या मागण्या काय आहेत सरकारच्या लक्षात आणून देऊ असेही विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.

**ओबीसी युवा संमेलन**

आम्ही मार्चच्या पहिल्या आठवड्यात ओबीसी युवा संमेलन घेणार आहोत. ओबीसींचे अधिकार यूजीसी सुधारणामुळे डावलण्याचा प्रयत्न केला गेला आहे. 'महा ज्योती' असताना सुद्धा पैसे मिळत नाहीत. विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे, ही योजना पूर्ण क्षमतेने सुरू नसल्याची खंतही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

**राष्ट्रीय ओबीसी आरक्षण**

या आंदोलनासाठी सगळ्यांनी सहभागी व्हावे. तसेच सध्या सुरु असलेल्या जनगणनेत ओबीसींनी सहभागी होऊ नये साठी घरापुढे पाठी लावावी. ओबीसीच्या कॉलमचा जनगणनेत समावेश करावा. तरच आम्ही जनगणनेत सहभागी होऊ असे आवाहन मी ओबीसी जनतेला करत आहे असेही विजय वडेट्टीवार यांनी यावेळी सांगितले.

**मंगळसूत्रामुळे परीक्षेत नाकारला**

विवाहित मुलींनी अभ्यास करूनही परीक्षा देऊ नये हे कोणते विचार आहेत. त्या महिलेला परीक्षेपासून वंचित ठेवले असेल तर त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे आणि अशा लोकांना जोड्याने मारल पाहिजे. जो त्या अधिकाऱ्यांला जोड्यांना मारून येईल त्याला २५,००० हजाराचे बक्षीस देऊ असेही विजय वडेट्टीवार यांनी माध्यमांशी बोलताना सांगितलं.

## पाकिस्तानला भरली धडकी

### भारताचा फ्रान्ससोबत होणार सर्वात मोठा करार...

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**

**मुंबई :** येत्या १८ ते २० फेब्रुवारीच्या काळात भारतात एआय समिट होणार आहे. या समिटसाठी फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्यूएल मॅक्रॉन भारतात येणार आहेत. मॅक्रॉन भारतात येण्याआधी केंद्रीय संरक्षणंत्री राजनाथ सिंह यांची संरक्षण अधिग्रहण परिषदेसोबत (DAC) बैठक होणार आहे.

फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात ही बैठक होण्याची शक्यता आहे. याच बैठकीत संरक्षण शस्त्र तसेच इतर सामग्रीच्या खरेदीबाबतच्या प्रस्तावांवर विचार केला जणार आहे.

**भारताच्या ताफ्यात दाखल होणार तब्बल ११४ लढाऊ विमाने**

टाईम्स ऑफ इंडियाने दिलेल्या वृत्तानुसार याच बैठकीत फ्रान्सकडून ३२ लाख कोटी रुपयांची एकूण ११४ राफेल विमानांच्या खरेदीला



**तब्बल ११४ राफेल विमानं...**

मान्यता दिली जाण्याची शक्यता आहे. यातील १८ विमाने लगेच उड्डाण घेण्यास तयार असतील. तर काही विमानांची निर्मिती ही भारतात केली जाणार आहे. भारतात तयार होणाऱ्या विमानांमध्ये ६० टक्के तंत्रज्ञान हे भारतीय असेल. फ्रान्स आणि भारत यांच्यात हा करार लवकरच होण्याची शक्यता आहे. या करारातील ११४ राफेल विमानांमधील साधारण ८० टक्के विमानांची निर्मिती ही भारतातच केली जाईल. या करारात भारताला ८८ सिंगल सिटर तर २६ टू सिटर लढाऊ विमाने मिळतील. या विमानांतील बहुसंख्य विमाने ही डसॉल्ट आणि भारतातील खासगी कंपन्यांच्या मदतीने तयार केली जातील.

**मॅक्रॉन भारतात आल्यानंतर कराराला अंतिम रुप?**

संरक्षण खरेदी बोर्डाकडून या प्रस्तावाला गेल्या महिन्यातच मंजुरी मिळालेली आहे. आणखी एक उच्चस्तरीय मंजुरी मिळाल्यानंतर या कराराविषयी चर्चा सुरू होईल. इमॅन्यूअल मॅक्रॉन भारतात येणार आहेत. त्यावेळी या कराराला अंतिम रुप मिळण्याची शक्यता आहे.

**पाकिस्तानची झोप उडाली**

दरम्यान, पहलगामवरील हल्ल्यानंतर भारत आपल्या सुरक्षेच्या बाबतीत खूपच सतर्क झालेला आहे. पाकिस्तान आणि चीनची जवळीक पाहता भारताने शस्त्रांच्या बाबतीत सज्ज राहण्याचे ठरवलेले आहे. त्याचाच एक भाग म्हणून हा महत्त्वाचा करार होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. परंतु भारताचे हे पाऊल म्हणजे पाकिस्तान तसेच चीनसाठी मोठे आव्हान असणार आहे, असे म्हटले जात आहे. त्यामुळे आता भविष्यात नेमके काय होणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## सुनील तटकरेंचे सूर बदलले

### राष्ट्रवादीच्या विलीनीकरणावर मोठं वक्तव्य म्हणाले...

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**

**मुंबई :** अजित पवारांच्या निधनानंतर दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनकरणाच्या चर्चांना ब्रेक लागला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते विलीनकरणाच्या चर्चा सुरू होत्या असे सांगत आहेत. तर, अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी विलीनीकरणा विषयी अजितदादांनी काही सांगितले नव्हते अशी भूमिका घेतली होती. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, प्रफुल



पटेल यांच्या भूमिकेमुळे दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणारी की नाही, याबाबत उलटसुलट चर्चा सुरू होती. मात्र, सुनील तटकरेंनी यूटर्न घेत मोठं वक्तव्य केलं आहे.

ते म्हणाले, दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाचा निर्णय आम्ही एकत्र बसून घेऊ. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या मंत्रिमंडळाच्या बैठकीसाठी मंगळवारी (ता.१०) येणार आहेत. तेव्हा या संदर्भात चर्चा होईल.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा अजितदादांचा परिवार आहे. विलीनीकरणाबाबत निर्णय परिवारातील सर्व सदस्य मिळून घेतील, असे त्यांना सांगितले.

**रामदास कदमांना टोला**

रामदास कदम यांनी सुनील तटकरे यांच्यावर जहरी टीका करत स्वत:च्या स्वार्थसाठी ते दोन्ही राष्ट्रवादीला एकत्र येऊ देत नसल्याचे म्हटले होते. शरद पवार सुत्र हाती घेतील ही त्यांनी भीती वाटत असल्याची टीका केली होती. त्यावर तटकरे यांनी कदमांना प्रत्युत्तर (पान ४ वर...☞ )

## काँग्रेसने २४ तासांत दलित समुदायाची माफी मागावी अन्यथा...

**दै.चालु वार्ता वृत्तसेवा**

**पंजाब :** पंजाब विधानसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस (Congress) नेते प्रताप सिंग बाजवा यांनी पंजाबचे कॅबिनेट मंत्री हरभजन सिंग यांच्याबद्दल केलेल्याआक्षेपार्ह वक्तव्याचा आम आदमी पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी तीव्र निषेध केला आहे. पंजाबचे अर्थमंत्री हरपाल



**आपच्या नेत्यांनी दिला इशारा !**

सिंग चीमा, वनमंत्री लालचंद कटारुचक आणि आपचे पंजाब मीडिया प्रभारी बलतेज पन्नू यांनी संयुक्तपणे या वक्तव्याचा तीव्र शब्दात निषेध केला.

काँग्रेस पक्षाला दलितविरोधी पक्ष म्हणत, तिन्ही नेत्यांनी बाजवा आणि काँग्रेस पक्षाला २४ तासांच्या आत माफी मागावी अन्यथा कठोर कायदेशीर आणि राजकीय कारवाईला सामोरे जावे असा कडक इशारा दिला. बाजवा यांचे वक्तव्य अत्यंत दुर्दैवी असल्याचे म्हणत हरपालसिंग चीमा म्हणाले की, कॅबिनेट मंत्री हरभजन सिंग हे अत्यंत गरिबीतून वर आले आहेत. त्यांनी नागरी सेवा परीक्षा उत्तीर्ण केली आणि पंजाब अलाइड सर्व्हिसेसमध्ये ईटीओ झाले. त्यानंतर त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला आणि सामाजिक सेवेच्या भावनेतून आम आदमी पक्षात सामील झाले. (पान ४ वर...☞ )









# उदगीरचा फैसला आज! १७ फेऱ्यांत होणार जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निकालाचा गुलाल

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
उदगीर - प्रतिनिधी
अविनाश देवकते

**लातूर (उदगीर) :** लातूर जिल्हा परिषद आणि उदगीर पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणूक २०२६ चा महासंग्राम आता अंतिम टप्प्यात पोहोचला असून, आज संपूर्ण तालुक्याचे लक्ष मतमोजणीकडे लागले आहे. प्रशासनाने मतमोजणीची जय्यत तयारी केली असून, एकूण २१ टेबलवर १७ फेऱ्यांमध्ये मतमोजणी पार पडणार आहे. आज दुपारपर्यंत सर्व जागांचे कल आणि निकाल स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

**२१ टेबलवर रंगणार मोजणीचे चक्र**

मतमोजणी सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासनाने २१ टेबलची मांडणी केली आहे. यामध्ये टेबल क्रमांक १ ते ७ हे टपाली मतदानासाठी (पोस्टल बॅलट) राखीव ठेवण्यात आले आहेत. यामध्ये वाढवणा बु., सोमनाथपूर, नळगीर, निडेबन, लोहारा, हेर आणि तोगरी या सात निवडणूक विभागांच्या टपाली मतांची मोजणी सुरुवातीला केली जाईल. त्यानंतर टेबल क्रमांक ८ ते २१ वर प्रत्यक्ष मतदान केंद्रांवरील यंत्रांमधील मतांची मोजणी फेरीनिहाय सुरूहोईल.

**विभागनिहाय केंद्रांचे नियोजन**

यावेळच्या मोजणीत प्रत्येक गटासाठी स्वतंत्र यंत्रणा लावण्यात आली आहे. वाढवणा बु. गटासाठी २९ मतदान केंद्र, सोमनाथपूर गटासाठी २८ केंद्रे, तर सर्वात जास्त मतदान केंद्रे असलेल्या निडेबन गटासाठी ३४ केंद्रांची मोजणी केली जाणार आहे. याशिवाय नळगीर (३३ केंद्रे), लोहारा (२८ केंद्रे), हेर (३० केंद्रे) आणि तोगरी (२८ केंद्रे) अशा क्रमाने मतमोजणी पार पडणार आहे. प्रत्येक फेरीनंतर अधिकृत घोषणा केली जाणार असून, उमेदवारांच्या प्रतिनिधींना प्रत्येक टेबलवर उपस्थित राहण्याची परवानगी देण्यात आली आहे.

**१७ फेऱ्यांचे आव्हान; दुपारपर्यंत चित्र स्पष्ट होणार**

एकूण १७ फेऱ्यांमध्ये ही संपूर्ण प्रक्रिया विभागली गेली आहे. सुरुवातीच्या काही फेऱ्यांमध्येच कल स्पष्ट व्हायला सुरुवात होईल. शेवटच्या टप्प्यात निडेबन आणि हेर यांसारख्या मोठ्या गटांचे निकाल हाती येतील. प्रशासनाने प्रत्येक टेबलवर सूक्ष्म निरीक्षक आणि मोजणी कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली असून, संपूर्ण प्रक्रियेचे चित्रीकरण केले जाणार आहे.

**चोख पोलीस बंदोबस्त आणि राजकीय उत्सुकता**

मतमोजणी केंद्राच्या परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून, परिसरात संचारबंदी लागू करण्यात आली आहे. केवळ अधिकृत पास असलेल्या व्यक्तींनाच प्रवेश दिला जात आहे. तालुक्यात कोणाचे वर्चस्व राहणार आणि कोण बाजी मारणार, याचा फैसला आजच्या या १७ फेऱ्यांमध्ये होणार असल्याने उमेदवारांसह समर्थकांची धाकधूक वाढली आहे.

# पुणे-मुंबई महामार्गावरील भीषण वास्तव आणि शिरूर-कर्जत समांतर महामार्गाची तातडीची गरज

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
खेड - प्रतिनिधी
विजयकुमार जेठे



**खेड :** पुणे-मुंबई-लोणावळा-खंडाळा हा महामार्ग राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. औद्योगिक वाहतूक, पर्यटन, रोजचा प्रवास आणि आपत्कालीन सेवा यांचा मोठा भार या एकाच मार्गावर टाकण्यात आला आहे. मात्र गेल्या काही वर्षांत हा महामार्ग 'लाईफलाईन' कमी आणि 'टाईमबॉम्ब' अधिक वाटू लागला आहे. दिवसेंदिवस वाढणारी वाहतूक कोंडी, अपघातांची मालिका आणि अपुऱ्या पर्यायी मार्गांमुळे परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. खंडाळा घाटात काही दिवसांपूर्वी धोकादायक वायू वाहतूक करणारा टँकर पलटी झाल्यानंतर तब्बल ३६ तास वाहतूक ठप्प राहिली. हजारो नागरिक रस्त्यावर अडकले, अनेकांना अन्न-पाणी आणि वैद्यकीय मदतीसाठी संघर्ष करावा लागला. या घटनेने प्रशासनाच्या आपत्कालीन नियोजनावर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे एका अपघाताने संपूर्ण राज्याची वाहतूक व्यवस्था ठप्प होणे ही धोक्याची घंटा आहे.

आजही पुणे-मुंबई मार्गावर एकाच वेळी हजारो मालवाहतूक ट्रक, टँकर्स आणि खासगी वाहने धावत आहेत. औद्योगिक विकास आणि पर्यटनवाढीमुळे वाहनसंख्या झपाट्याने वाढली आहे; मात्र रस्त्याची क्षमता आणि पर्यायी मार्गांची व्यवस्था तितक्याच वेगाने वाढलेली नाही. घाटमाथ्यावरील भौगोलिक अडचणी, वळणदार रस्ते आणि धोकादायक वाहतूक यामुळे अपघातांचा धोका कायम आहे. तरीही दीर्घकालीन उपाययोजना करण्याबाबत प्रशासनाची गती अत्यंत संथ दिसते.

याच पार्श्वभूमीवर अनेक वर्षांपासून चर्चेत असलेला 'शिरूर-कर्जत समांतर महामार्ग' हा केवळ पर्याय नाही, तर गरज बनला आहे. हा मार्ग उभारला तर मालवाहतूक मराठवाडा, विदर्भातील वाहनांना तसेच लांब पल्ल्याच्या वाहनांना वेगळी दिशा मिळेल, घाटातील ताण कमी होईल आणि अपघात किंवा आपत्तीच्या वेळी नागरिकांना पर्यायी मार्ग उपलब्ध होईल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे एकाच मार्गावर अवलंबून राहण्याचा धोका मोठ्या प्रमाणात कमी होईल.

दुर्दैवाची बाब म्हणजे हा प्रकल्प अनेक वर्षांपासून चर्चेत असूनही प्रत्यक्षात फारशी प्रगती झालेली नाही. केवळ घोषणा, बैठका आणि कागदी आराखडे यापलीकडे काहीच घडलेले नाही. दरम्यान, दररोज हजारो नागरिक वाहतूक कोंडीत अडकून त्रस्त होत आहेत आणि राज्याच्या अर्थकारणालाही मोठा फटका बसत आहे. उद्योग क्षेत्रातील माल उशिरा पोहोचणे, पर्यटनावर परिणाम आणि आपत्कालीन सेवांना होणारा विलंब यामुळे मोठे नुकसान होत आहे. आता प्रश्न फक्त वाहतूक कोंडीचा राहिलेला नाही हा नागरिकांच्या सुरक्षिततेचा आणि राज्याच्या भवितव्याचा प्रश्न बनला आहे. प्रशासनाने तात्पुरत्या उपायांवर वेळ न घालवता दीर्घकालीन नियोजन करणे आवश्यक आहे. शिरूर-कर्जत समांतर महामार्गासाठी ठोस निधी, निश्चित वेळापत्रक आणि पारदर्शक अंमलबजावणी जाहीर केली पाहिजे.

अन्यथा प्रत्येक अपघातानंतर हजारो नागरिकांना त्रास सहन करावा लागणार आणि भविष्यातील मोठ्या आपत्तीचे धोके वाढतच जाणार. खंडाळा घाटातील टँकर अपघात हा एक इशारा आहे अजूनही वेळ गेलेली नाही. आता तरी शासनाने जागे होऊन पर्यायी महामार्ग उभारणीसाठी ठोस पावले उचलली नाहीत, तर 'लाईफलाईन' मानला जाणारा हा मार्ग नागरिकांसाठी संकटाचा महामार्ग ठरण्याची भीती नाकारता येणार नाही.

# देहू-येलवाडीत श्री संत गजानन महाराजांच्या १४८ व्या प्रगट दिनानिमित्त भव्य पालखी मिरवणूक व महाप्रसाद

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
पिंपरी चिंचवड - प्रतिनिधी

**देहू-येलवाडी :** श्री संत गजानन महाराज (शेगाव) यांच्या १४८ व्या प्रगट दिनानिमित्त देहू-येलवाडी परिसरात भक्तिभावपूर्ण वातावरणात भव्य पालखी मिरवणूक व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. या धार्मिक सोहळ्याला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. दि. २ ते ९ या कालावधीत शहरातील विविध ठिकाणी श्री विजय ग्रंथ गजानन महाराजांचे पारायण आयोजित करण्यात आले होते. त्याचाच एक भाग म्हणून खेड तालुक्यातील येलवाडी येथील सांगली प्लॉटिंग परिसरातील इंद्रायणी रिव्हर पार्क सोसायटीमध्ये गेल्या दहा वर्षांपासून सातत्याने श्री संत गजानन महाराजांचा प्रगट दिन सोहळा साजरा केला जात आहे.




अनु रेणु मध्ये ब्रह्म व्यापिले ।
लय उत्पत्ती समान ।
माधव सप्तमी पुण्य दिवशी ।
प्रगटले योगी महान ।।

या निमित्ताने येलवाडी-देहू शहरातून श्री संत गजानन महाराजांची भव्य पालखी मिरवणूक काढण्यात आली. पालखी संत तुकाराम महाराज मुख्य मंदिरात पोहोचल्यानंतर आरती करण्यात आली. तसेच श्री संत तुकाराम महाराज मंदिराच्या विश्वस्तांच्या वतीने श्री संत गजानन महाराजांच्या पालखीचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.


पालखी मिरवणुकीत येलवाडी-देहू परिसरातील असंख्य भाविक भक्त, वारकरी शिक्षण संस्थेचे विद्यार्थी तसेच महिलांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग होता. 'गण गण गणात बोते' या जयघोष व भजनांनी संपूर्ण देहू नगरी भक्तिरसात न्हाऊन निघाली. मिरवणुकीनंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे आयोजन इंद्रायणी रिव्हर पार्क, सांगुर्डी रोड, गट नं. १०९, येलवाडी (ता. खेड) येथील स्वप्निल नारखेडे, मंगेश खाचणे, विकास कोलते, ज्ञानदेव बडे, दीपक महाराज, निलेश पाटील, गजानन बडे व बद्रीनारायण घुगे यांच्या वतीने करण्यात आले.

# विधी दशक्रियेचा, आदर्श सामाजिक बांधिलकीचा !

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
वाघोली - प्रतिनिधी
स्वरुप गिरमकर

**वाघोली :** येथील वडजाई गावातील किसनराव सातव ह्यांचा दशक्रिया विधी रविवार दि.२५ जानेवारी २०२६ रोजी झाला. दशक्रियेनिमित्त पारंपरिक पद्धतीने ह.भ.प. दत्तात्रय वांजळे महाराज ह्यांचे प्रभावी प्रवचनही झाले. महाराजांनी नेहमीप्रमाणे जीवनमूल्ये, सामाजिक बांधिलकीबरोबरच उपस्थितांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. एरव्ही दशक्रियेच्या निमित्ताने अनेकजण परिसरातील मंदिरांच्या जीर्णोद्धारासाठी आपापल्या कुवतीनुसार आर्थिक मदत जाहीर करतात. परंतु स्व. किसनराव सातव ह्यांच्या वारसदारांनी मात्र ह्यावेळी ज्ञानमंदिरांच्या जीर्णोद्धाराचा निर्धार व्यक्त घेतला.



अतिशय प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन शिक्षकी पेशात आदर्श कामगिरी करत असलेले बबनराव सातव सर ह्यांनी ह्यावेळी पुढाकार घेऊन आपल्या वडिलांच्या स्मरणार्थ परिसरातील वाड्यावस्त्यांवरील शाळांना तब्बल एक लाख रूपयांची मदत जाहीर केली. ग्रामीण भागातील ह्या शाळांमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात, परिसरातील मुलांना उत्तम शिक्षण मिळावे, ह्या हेतूने प्रेरित होऊन केलेली मदत ही खरीखुरी श्रद्धांजली असल्याची प्रतिक्रिया ह्यावेळी अनेकांनी व्यक्त केली.

सातव घराण्यातील विष्णूजी सातव यांचे स्मरणार्थ विठ्ठलराव सातव यांनी सातव हायस्कूलसाठी ११ एकर जागा देऊन ज्ञान मंदिराचा सुरवातीला जीर्णोद्धार केला. त्यानंतर कृष्णाजी सातव यांचे वारसदारांनी दादासाहेब सातव यांनीही जिल्हा परिषद शाळा वडजाई या शाळेला जागा देऊन त्यात भर पाडली तर ह्याच घराण्यातील बबनराव सातव सर आणि त्यांचे बंधू यांनीही एक लाख रुपयाची मदत करून ज्ञान मंदिराच्या जीर्णोद्धारची परंपरा अखंड जोपासली. ह्या सातव घराण्याचं मोलाचे योगदान शिक्षण क्षेत्रासाठी आहे ही बाब नक्कीच अनुकरणीय आहे. सातव परिवाराच्या अशा आर्थिक मदतीमुळे परिसरातील शाळा ह्या क्रांतिज्योती विद्यालयासारखी उभारी घेतील, अशी आशा ह्यावेळी उपस्थित अनेक मान्यवरांनी व्यक्त केली.

# पालघरमध्ये नागरिक-प्रशासन थेट संवाद

## जनता दरबाराचे आयोजन

### पालकमंत्री गणेश नाईकांचा नागरिकांशी थेट संवाद
### सर्व शासकीय विभागांचे प्रमुख उपस्थित राहणार

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
पालघर - प्रतिनिधी
मिलिंद चुरी

**पालघर :** वनमंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार, ९ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १२ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती सभागृहात जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले आहे. या जनता दरबाराच्या माध्यमातून जिल्ह्यातील नागरिकांच्या समस्या, तक्रारी व अडचणी थेट ऐकून त्यावर तात्काळ तोडगा काढण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

या जनता दरबारात पालकमंत्री गणेश नाईक नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधणार असून विविध विभागांशी संबंधित प्रलंबित प्रश्नांवर निर्णय घेण्यात येणार आहेत. नागरिकांनी आपल्या समस्या व तक्रारींच्या निराकरणासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी केले आहे.

जनता दरबाराच्या वेळी तक्रारींच्या प्रभावी निवारणासाठी जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयांचे प्रमुख अधिकारी उपस्थित राहणार आहेत. यापूर्वी आयोजित करण्यात आलेल्या जनता दरबाराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला होता, त्या पार्श्वभूमीवर यंदाच्या आयोजनाबाबतही प्रशासनाकडून विशेष तयारी करण्यात आली आहे.

नागरिकांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या तळ मजल्यावर संगणकीकृत टोकन प्रणाली उपलब्ध करून देण्यात आली असून टोकन घेतल्यानंतर विभागनिहाय तक्रार अर्ज नोंदणीसाठी स्वतंत्र टेबल्सची व्यवस्था करण्यात आली आहे.

महसूल विभाग, जिल्हा परिषद, वसई-विरार महानगरपालिका, नगर पालिका प्रशासन, भूमी अभिलेख, निबंधक कार्यालय, वन, कृषी, आरोग्य, महावितरण, एस.टी., बीएसएनएल, सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पाटबंधारे, जलसंधारण, पोलीस प्रशासन, मत्स्य व पत्तन विभाग, जिल्हा उद्योग केंद्र, अन्न व औषध प्रशासन, समाजकल्याण, जात पडताळणी, कामगार आयुक्त, नगर रचना, एमआयडीसी, रेल्वे, एमटीडीसी, महिला व बालविकास, कौशल्य विकास, दुग्ध विकास, प्रदूषण नियंत्रण मंडळ, अग्रणी बँक, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प (डहाणू व जव्हार), राज्य उत्पादन शुल्क, प्रादेशिक परिवहन विभाग यांच्यासह उर्वरित सर्व शासकीय विभागांचे टेबल्स नियोजन समिती सभागृह परिसरात उभारण्यात आले आहेत.

९ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर येथे होणाऱ्या जनता दरबारात नागरिकांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून आपल्या समस्या व प्रश्नांचा निपटारा करून घ्यावा, असे पुन्हा एकदा जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांनी आवाहन केले आहे.

# इंदिरा नगरातील देशी दारूचे दुकान हटविण्याच्या मागणीसाठी नागरिकांचा आंदोलनाचा इशारा

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
रिसोड - प्रतिनिधी
विजय जुंजारे

**रिसोड :** इंदिरा नगर, लोणी रोड, रिसोड येथील देशी दारूचे दुकान तात्काळ हटविण्यात यावे, या मागणीसाठी परिसरातील नागरिकांनी आंदोलन व उपोषणाचा इशारा दिला आहे. यासंदर्भात इंदिरा नगरातील रहिवाशांच्या वतीने तहसीलदार रिसोड यांना लेखी निवेदन सादर करण्यात आले आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सदर देशी दारूचे दुकान गेल्या अनेक वर्षांपासून सुरूअसून त्यामुळे परिसरातील सामाजिक वातावरण पूर्णतः बिघडले आहे. दारूच्या दुकानामुळे महिलांमध्ये, मुलींमध्ये व ज्येष्ठ नागरिकांमध्ये भीतीचे



वातावरण निर्माण झाले असून, दारू पिणाऱ्यांकडून शिवीगाळ, भांडणतंटे, आरडाओरडा, अश्लील वर्तन असे प्रकार सातत्याने घडत आहेत. परिसरात शाळा, वस्ती व रहिवासी भाग असतानाही नियमबाह्य पद्धतीने दुकान सुरू असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. या दुकानामुळे सार्वजनिक शांतता भंग पावत असून कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. याबाबत अनेक वेळा प्रशासनाकडे तक्रारी व निवेदने देण्यात आली असली, तरी अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही, असा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. प्रशासनाने वेळेत दखल न घेतल्यास दिनांक ९ फेब्रुवारी २०२६ (सोमवार) रोजी इंदिरा नगर, लोणी रोड येथील देशी दारू दुकानासमोर शांततामय आंदोलन व उपोषण करण्यात येणार असल्याचा स्पष्ट इशारा नागरिकांनी दिला आहे. आंदोलनादरम्यान कोणताही अनुचित प्रकार, अपघात किंवा कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या निवेदनाची प्रत पोलीस अधीक्षक वाशिम, राज्य उत्पादन शुल्क विभाग, तहसीलदार रिसोड, रिसोड पोलीस स्टेशन, नगर परिषद रिसोड तसेच लोकप्रतिनिधींना देण्यात आली आहे.

इंदिरा नगरातील नागरिकांनी प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून देशी दारूचे दुकान कायमस्वरूपी हटवावे, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही दिला आहे.

# सर्वांनी आपल्या मध्ये योग्य बदल घडविण्यासाठी रमाईचा आदर्श घ्यावा - सरपंच चंद्रकला सूर्यवंशी

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
मंठा - प्रतिनिधी
सुरेश ज्ञा. दवणे

**जालना (मंठा) :** तालुक्यातील नायगाव येथे सरपंच चंद्रकला सूर्यवंशी यांच्या अध्यक्षानवे उत्साहात माता रमाई च्या जय घोषनेने आणि मातेच्या पूजन आणि पुष्पहार अर्पण करून गौतम बुद्ध विहार मध्ये माता - भगिनीच्या अनुषंगाने करण्यात आली. आज कुटुंब आणि समाजाला माता



रमाईच्या परिवर्तनीय विचाराची नितांत गरज...अविनाश राठोड

जयंती च्या प्रसंगी संपूर्ण गावकऱ्यांना भाजपा ता. अध्यक्ष नितिन राठोड यांनी दूरध्वनीद्वारे शुभेच्छा दिल्या. नायगाव येथिल संपूर्ण गल्ली आणि बोळी भारत रत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, माता रमाई, छत्रपती शिवाजी महाराज, संत सेवालाल महाराज, बिरसा मुंडा आणि भगवान बाबा च्या जय घोषणानीं गौतम बुध्दाच्या अनुयानीं संपूर्ण नायगाव गाव दगमगले. जयंती प्रसंगी अविनाश राठोड, नामदेव फुपाटे, राहुल सूर्यवंशी, पोलीस पाटील मीनाक्षी फुपाटे, गौतम दहिजे, अनिल राठोड, बापू मगर, प्रह्लाद फुपाटे, गणेश आभुरे सह गावतील संपूर्ण माता भगिनीं आणि गावकारी उपस्थित होते.

# नगरसेवक प्रतिनिधी प्रभू कोल्हे यांची कारवाई

## स्मशानभूमी रस्त्यावरून घाण हटली

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
किनवट - प्रतिनिधी
शुभम शिंदे

**किनवट :** प्रभाग क्रमांक ८ मधील नगरसेविका गंगाबाई कोल्हे यांचे प्रतिनिधी प्रभू कोल्हे यांनी प्रभागातील रखडलेल्या कामांवर धडाका लावला असून मारखंडे मंदिर ते हिंदू स्मशानभूमी दरम्यानच्या रस्त्यावरील घाणीची समस्या अखेर मार्गी लावली आहे. या मार्गावर दीर्घकाळ घाणीचे साम्राज्य माजले होते. परिसरातील नागरिकांनी अनेक वेळा लोकप्रतिनिधी व नगर परिषदेकडे तक्रारी केल्या होत्या; मात्र समस्येकडे अपेक्षित लक्ष दिले जात नव्हते. प्रभू कोल्हे यांनी स्वतः लक्ष घालून संबंधित




विभागाशी समन्वय साधला आणि स्वच्छता मोहीम राबवून रस्ता स्वच्छ करून घेतला. या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून प्रभागातील इतर प्रलंबित कामांनाही गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



# महा गौण खनिज पोर्टलवर दुजाभाव

## तेलंगणातील वाळू आणण्यास महाराष्ट्राला ‘नो एन्ट्री’ मात्र महाराष्ट्रात ‘रेड कार्पेट’ कसे?

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
देगलूर - प्रतिनिधी
संतोष मंनधरणे

**देगलूर :** तेलंगणा राज्याने महाराष्ट्रातील वाहनांना आपल्या राज्यातून वाळू नेण्यास कडक निर्बंध घातले असताना महाराष्ट्र शासन मात्र तेलंगणा, कर्नाटक व आंध्र प्रदेशातील वाहनांना महा गौण खनिज पोर्टलवरून मोकळीक देत असल्याचा दुजाभाव उघड झाला आहे. यामुळे महाराष्ट्राची वाळू परप्रांतात जात असून राज्याचा दीर्घकालीन वाळू व्यवसाय, महसूल आणि स्थानिक रोजगार या बाबी धोक्यात येत असल्याचे दिसून येत आहे. महाराष्ट्र शासनाच्या महा गौण खनिज (Maha Mining) पोर्टलवरील सध्याच्या धोरणामुळे राज्याच्या नैसर्गिक संपत्तीबरोबरच आर्थिक हितालाही मोठा धक्का बसत असल्याचा आरोप स्थानिक वाहन चालक व संघटनांकडून करण्यात येत आहे. एकीकडे तेलंगणा राज्याने महाराष्ट्रातील टिप्पर, हायवा व ट्रक यांना आपल्या शासकीय वाळू घाटातून वाळू उचलण्यास स्पष्ट ‘नो एन्ट्री’ दिली आहे, तर दुसरीकडे महाराष्ट्र शासन मात्र तेलंगणा, कर्नाटक व आंध्र प्रदेशातील



वाहनांना येथे खुलेआम पासिंग देत आहे.

महा गौण खनिज पोर्टलच्या माध्यमातून परप्रांतीय हायवा, टिप्पर व ट्रक महाराष्ट्रातील शासकीय वाळू घाटातून अत्यल्प दरात वाळू उचलून तीच वाळू परप्रांतात तिप्पट ते चौपट दराने विक्री करत आहेत. परिणामी महाराष्ट्राची वाळू स्वस्तात बाहेर जात असून त्यातून होणारा नफा परप्रांतीय व्यापाऱ्यांच्या घशात जात आहे.

**आर्थिक नुकसान आणि महसुलावर फटका**

या अमर्याद व बेकायदेशीर वाहतुकीमुळे महाराष्ट्र शासनाच्या वाळू विक्रीतून मिळणाऱ्या महसुलावर मोठा परिणाम होत आहे. दीर्घकालीन चालणारा वाळू व्यवसाय अल्पावधीतच संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहे, भविष्यातील महसुलाचे स्रोत आजच संपवले जात आहेत आणि राज्याला कोट्यवधी रुपयांच्या संभाव्य उत्पन्नावर पाणी सोडावे लागत आहे. अनेक शासकीय वाळू घाट नियोजनानुसार वर्षानुवर्षे चालण्यासाठी असताना, परप्रांतीय वाहनांच्या अति उत्खननामुळे ते काही महिन्यांतच निष्प्रभ ठरत असल्याचे चित्र आहे. याचा फटका शासनाच्या आर्थिक नियोजनावर आणि स्थानिक विकासकामांवर बसणार आहे.

**स्थानिकांचा रोजगार धोक्यात**

या परिस्थितीचा सर्वात मोठा फटका महाराष्ट्रातील स्थानिक टिप्पर, हायवा व ट्रक चालकांना बसत आहे. स्थानिक वाहनांचे काम बंद पडले असून अनेक चालकांची वाहने उभी राहिली आहेत रोजंदारीवर काम करणारा मजूर वर्ग बेरोजगार झाला आहे. स्थानिक कुटुंबांच्या उपजीविकेवर संकट ओढावले आहे. महाराष्ट्राची वाळू जाते.

**प्रशासन संशयाच्या भोवऱ्यात**

यापूर्वी जिल्हाधिकारी स्तरावर परप्रांतीय वाहनांवर निर्बंध घालून काही वाहने ब्लॅकलिस्ट करण्यात आली होती. मात्र नंतर आर्थिक व्यवहारातून काही वाहनांची नावे ब्लॅकलिस्टमधून वगळून पुन्हा पासिंग देण्यात आल्याचे गंभीर आरोप समोर येत आहेत. त्यामुळे हा प्रकार केवळ धोरणात्मक चूक नसून प्रशासनिक संगनमताचा संशय अधिक बळावत आहे.

एकूणच तेलंगणा जर महाराष्ट्रासाठी बंद असेल, तर महाराष्ट्र परप्रांतीयांसाठी उघडा का? जर समतेच्या तत्त्वावर तेलंगणा निर्बंध घालू शकते, तर महाराष्ट्र शासनाने आपल्या राज्यातील नैसर्गिक संपत्ती, महसूल आणि स्थानिक रोजगाराचे संरक्षण करण्यासाठी तसाच निर्णय का घेतला नाही?

दरम्यान, मोटार वाहतूक संघटना देगलूर व स्थानिक वाहन चालकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार सादर करून तेलंगणा, कर्नाटक व आंध्र प्रदेश येथील वाहनांची पासिंग तात्काळ बंद करावी, केवळ महाराष्ट्र नोंदणी असलेल्या वाहनांनाच प्राधान्य द्यावे, आणि महा गौण खनिज पोर्टलवरील दुजाभाव तात्काळ थांबवावा अशी मागणी केली आहे. तात्काळ निर्णय न झाल्यास हे प्रकरण लोकायुक्त, न्यायालय माध्यमातून राज्यपातळीवर उचलून धरले जाईल असा इशारा ही देण्यात आला आहे. हा प्रश्न केवळ वाळूचा नसून महाराष्ट्राच्या भविष्यातील महसुलाचा, स्थानिक रोजगाराचा आणि राज्याच्या आर्थिक सुरक्षिततेवर घाव घालणारा आहे. हे विशेष होय..!

# कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांची परत माजलगांव येथे नियुक्ती

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
माजलगांव - प्रतिनिधी
नाजेर कुरेशी

**माजलगाव :** माजलगाव शहर पोलीस ठाण्याचे कर्तव्यदक्ष, निर्भीड व लोकाभिमुख पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांची बिड येथे कंट्रोल रूमला बदली करण्यात आली होती माजलगाव शहरात नागरिक, व्यापारी व विविध सामाजिक पत्रकार संघटनांतून दुःख व्यक्त करण्यात येत होते. आपल्या कार्यकाळात पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांनी कायदा-सुव्यवस्था सक्षमपणे राखत गुंन्हेगारीवर नियंत्रण मिळवले. होते सामान्य नागरिकांशी आपुलकीने संवाद साधत त्यांनी पोलीस-नागरिक नातेसंबंध अधिक दृढ केले होते. महिलांच्या सुरक्षिततेसाठी, वाहतूक शिस्त, तसेच अवैध धंद्यांविरोधात त्यांनी कणखर भूमिका आहें.

त्यांच्या कार्यशैलीमुळे माजलगाव शहरात शांतता व सुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. दबावाला न झुकता, प्रामाणिकपणे काम करणाऱ्या अधिकाऱ्याची बदली होणे म्हणजे चुकिचे होते. माजलगावकरांसाठी खंतजनक असल्याची भावना



पोलिस निरीक्षक राहुल सुर्यतळ माजलगावकराच्या सेवेत चोविस घंटे उपलब्ध सर्वमान्यात आंनद व्यक्त होत आहे

नागरिकांनी व्यक्त केली होती. विविध सामाजिक व नागरिक संघटनांनी पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांच्या सेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. चांगल्या व कर्तव्यदक्ष आधिकार्याची बदली रद्द करावी म्हणून नेते पत्रकार सामाजिक यांनी पोलिस निरीक्षक सुर्यतळ साहेब यांच्यासाठी निवेदन आंदोलनचा ईशारा बिड एस पि साहेबाना दिला होता माजलगाव शहर पोलिस निरीक्षक ठाण्यात परत निवक्ती करावी. म्हणून अग्र धरला चुक एकाची आणि चांगल्या अधिकारी अचानक बदली होणे म्हणजे चोर सोडून संन्यासाला फाशी किती योंग्य होता. ज्यांनी केले त्यांना आरोपी करुन कायदेशीर कारवाई करावी परंतु प्रमाणीक काम करुन पोलिस प्रशासनाचे नांव ऊच्च करणारे पोलिस अधिकारी यांच्या अन्याय का? झाला होता.

माजलगाव शहर पोलिस ठाण्यात व वरिष्ठ अधिकारी यांच्या हस्ते सन्मान मिळवलेल्या व शहरात शांतता काय निर्माण करण्यासाठी दिवस रात्र प्रयत्न व कोणत्याही राजकीय दबाव न जुमता आपले नांव उच्च स्थळावर निर्माण करणारे पोलिस निरीक्षक सुर्यतळ चुक दुसर्याची आणि सजा यांना सत्य परेशान हो सकता है पर हारता नहीं असाच प्रकार माजलगांव शहरात घडला. पोलिस निरीक्षक राहुल सुर्यतळ यांना माजलगाव शहर पोलिस ठाण्यात परत रुजूं करण्यात आले आहे, पत्रकार सामाजिक कार्यकर्ते यांनी मिळुण सत्याचा विजय मिळविला माजलगावात आंनद व्यक्त होत आहे.

# तामसा येथे माता रमाई जयंती मोठ्या उत्साहात साजरी

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
तामसा सर्कल - प्रतिनिधी
बाबाराव काळबांडे

**तामसा सर्कल :** भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर या महामानवाची सावली माता रमाई माऊली यांच्या जयंतीनिमित्त तामसा येथे बुद्ध विहारात माता रमाई यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. यावेळी तामसा गावचे प्रथम नागरिक सरपंच आनंदरावजी घंटालवार तामसा पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक खेडकर साहेब, वंचित बहुजन आघाडीचे तालुका युवा अध्यक्ष जयकिन रावळे., जेष्ठ कार्यकर्ते तामसा वंचित बहुजन आघाडीचे ज्येष्ठ कार्यकर्ते नागोराव कदम, ग्रामपंचायत सदस्य आकाश जाधव. पत्रकार गौतम कदम, भारतीय बौद्ध महासभा तालुका अध्यक्ष भिमराव कांबळे तालुका संस्कार सचिव तथा बौद्धाचार्य सोनबाराव दवणे,



आंबेडकर नगर तामसा येथील सर्व बौद्ध महासभा कार्यकारिणी, महिला आघाडी मनिषा अमोल जाधव, आम्रपाली मधुकर जाधव सर्व महिलामंडळ, तामसा भारतीय बौद्ध महासभा शाखा तामसा अध्यक्ष नितिन खंदारे, भीम टायगर सेना सतीश जाधव, मधुकर जाधव आणि सर्व आंबेडकर नगर, व गावातील नागरिक उपस्थित होते. द्वितीय सत्रात केंद्रप्रमुख तथा केंद्रिय मुख्याध्यापक राजकुमार बास्टेवाड, खाजाभाई कुरेशी उपसरपंच तामसा, सचिन शिंदे आणि उमरी जहागीर येथील ज्येष्ठ उपासिका रेणुकाबाई मवाडे व अनेक महिला वर्ग उपस्थित होते. यावेळी चिमुकले कलाकार यांनी नाटकातून रमाई जन्म गीत, रमाई आणि बाबासाहेब यांच्या लग्नाचा देखावा, दिसे ती रमा शोभून... सुभेदाराची सून या गीतावर कला सादर केली. रमाईच्या जीवनावरील विविध प्रकारचे प्रसंग नाट्य रूपात सादर रमाई चे जीवन चारित्र्य प्रेक्षकांसमोर सादर करण्याचे आले.

# आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते शहीद भगतसिंग चौक सुशोभीकरण कामाचा शुभारंभ

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
जालना - प्रतिनिधी
आकाश माने

**जालना :** जालना शहरातील एक महत्त्वाचा आणि वर्दळीचा भाग असलेल्या शहीद भगतसिंग चौकाच्या सुशोभीकरण कामाचा शुभारंभ शिवसेना उपनेते तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते आज मोठ्या उत्साहात पार पडला. या सुशोभीकरणामुळे चौकाचे सौंदर्य वाढण्यासोबतच नागरिकांसाठी वाहतूक व्यवस्था अधिक सुलभ व सुरक्षित होणार आहे.

शहीद भगतसिंग चौक हा शहराच्या दृष्टीने ऐतिहासिक व सामाजिकदृष्ट्या महत्त्वाचा चौक असून, या ठिकाणी आधुनिक पद्धतीने सुशोभीकरण करण्यात येणार आहे. चौकात आकर्षक लँडस्केपिंग, प्रकाशव्यवस्था, सजावटीचे



घटक तसेच वाहतूक नियोजनास पूरक अशी रचना करण्यात येणार असल्याने परिसराला नवा देखावा मिळणार आहे.

या प्रसंगी उपस्थित नागरिकांना मार्गदर्शन करताना आमदार अर्जुनराव खोतकर म्हणाले की, ‘शहराच्या सर्वांगीण विकासासाठी पायाभूत सुविधा बळकट करणे अत्यंत आवश्यक आहे. नागरिकांच्या सोयीसाठी व शहराच्या सौंदर्यात भर घालणारी कामे सातत्याने राबविण्यात येत असून, भगतसिंग चौक सुशोभीकरण हे त्यातीलच एक महत्त्वाचे पाऊल आहे.’

या शुभारंभ सोहळ्याला शिवसेना संपर्कप्रमुख पंडितदादा भुतेकर, महानगरपालिका गटनेते दीपक राठोड, नगरसेवक दिनेश भगत, नगरसेवक कमलेश खरे, संजय गायकवाड, गणेश राऊत, नगरसेवक योगेश भगत बाला परदेशी यांच्यासह शिवसेना, युवासेना पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित पदाधिकाऱ्यांनीही शहर विकासाच्या कामांना गती देण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याची भूमिका व्यक्त केली. नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत करत लवकरात लवकर काम पूर्ण करून चौक नागरिकांसाठी खुला करण्यात यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

भगतसिंग चौक सुशोभीकरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर हा चौक शहराच्या सौंदर्यात भर घालणारा आणि एक आकर्षक ओळख निर्माण करणारा ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# इंजनगाव येथे अखंड हरिनाम सप्ताह व शिवलिलामृत पारायण सोहळ्याला प्रारंभ

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
वसमत - प्रतिनिधी
बालाजी अडकिने

**वसमत :** इंजनगाव (पूर्व-पश्चिम) ता. वसमत, जि. हिंगोली येथे वर्ष ३२ वे अखंड हरिनाम सप्ताह व शिवलिलामृत पारायण सोहळा मोठ्या भक्तिभावात सुरू होत आहे. या धार्मिक सोहळ्याचा प्रारंभ सोमवार, दि.०९ फेब्रुवारी २०२६ रोजी होणार असून सोमवार, दि. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी सांगता होणार आहे. या सप्ताहात दररोज सकाळी काकडा, शिवलिलामृत पारायण, भजन, प्रवचन, हरिपाठ व हरिकीर्तन असे विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या सोहळ्यात महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार श्री ह. भ. प. कीशन महाराज ठाकूरबुवा (चिखलीकर), श्री ह. भ. प. माणीक महाराज रेंगे




(जांब) श्री ह. भ. प. दिनानाथ महाराज (इंजनगावकर,) श्री ह. भ. प. पांडुरंग महाराज काळे (दैठणकर) श्री ह. भ. प. गुरुवर्य कुंडलिक महाराज भारती (पुयणीकर), श्री ह. भ. प. सोनाली ताई हुंबे (बाभळीकर,) श्री ह. भ. प. विठ्ठल महाराज नालेगावकर आदी कीर्तनकारांची मधुर वाणीतून कीर्तने होणार आहेत.या अखंड हरिनाम सप्ताहाचे विशेष महत्त्व असे की हा सोहळा महाशिवरात्रीच्या पावन काळात होत आहे. महाशिवरात्री हा दिवस भगवान शंकराच्या उपासनेसाठी अत्यंत फलदायी मानला जातो. या दिवशी उपवास, रुद्राभिषेक, हरिनाम स्मरण व शिवलिलामृत पारायण केल्यास पापक्षालन होऊन मन:शांती व आध्यात्मिक उन्नती साधते, अशी भक्तांची श्रद्धा आहे.

महाशिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर शिवलिलामृताचे पारायण व हरिनाम सप्ताह झाल्याने या सोहळ्याला विशेष धार्मिक महत्त्व प्राप्त झाले असून भाविक मोठ्या श्रद्धेने सहभाग नोंदवत आहेत. ‘शिवभक्ती आणि हरिनाम यांचा संगम म्हणजेच खरा महाशिवरात्री उत्सव’ अशी भावना यावेळी भाविकांतून व्यक्त होत आहे. सप्ताहाचे नेतृत्व श्री ह.भ.प. रावजी महाराज जाधव, श्री ह.भ.प. विष्णू गोविंद अडकिने यांच्या मार्गदर्शनाखाली होत असून काकडा व भजन सेवेसाठी अनेक संत-महाराज सहभागी होणार आहेत. सांगता समारंभ सोमवार, दि. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ ते १ वाजेपर्यंत होणार असून यावेळी श्री ह.भ.प. दीपक गुरु पांगरा ढोणे यांचे काल्याचे कीर्तन होईल. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे हा संपूर्ण कार्यक्रम संगमेश्वर महादेव मंदिर, इंजणगाव (पूर्व-पश्चिम) येथे होत असून सर्व भाविकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक समस्त गावकरी मंडळी यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# बच्चू कडूंच्या राज्यस्तरीय आढावा नियोजन समितीवर शिवाजी गाडे

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
पैठण - प्रतिनिधी
तुषार नाटकर

**छ. संभाजीनगर(पैठण) :** प्रहारचे संस्थापक अध्यक्ष बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली प्रहार पक्षाची आढावा व नियोजन समिती तयार करण्यात आली असून या चार जणांच्या समितीमध्ये पैठण येथील शिवाजी गाडे यांची निवड करण्यात आली आहे. समितीच्या राज्य दौऱ्याला २३ फेब्रुवारी पासून सुरुवात होणार आहे.

राज्यस्तरीय प्रहारच्या आढावा व नियोजन समितीमध्ये प्रहार पक्षाचे कार्याध्यक्ष बल्लूभाऊ जवंजाळ, महाराष्ट्र राज्य अभियान प्रमुख महेश बडे, प्रहार दिव्यांग संघटनेचे प्रदेशाध्यक्ष धर्मेंद्र सातव व प्रहार दिव्यांग संघटनेचे राज्य उपाध्यक्ष शिवाजी गाडे पैठण यांची निवड करण्यात आली आहे.

राज्यस्तरीय आढावा नियोजन दौऱ्याबाबत बच्चू कडू यांच्यामार्फत अधिकृत पत्र आदेश काढण्यात आला असून प्रहार जनशक्ती पक्ष व प्रहार दिव्यांग संघटनेच्या सर्वच जिल्हाध्यक्ष तालुकाध्यक्षांचा आढावा घेतला जाणार आहे.

दिनांक २३ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी यादरम्यान विदर्भ विभागाचा , दिनांक ५ मार्च ते १० मार्च या दरम्यान खानदेश व कोकण विभागाचा, दिनांक १५ मार्च ते १८ मार्च यादरम्यान मराठवाडा विभागाचा तर दिनांक २३ मार्च ते २७ मार्च यादरम्यान



पश्चिम महाराष्ट्र विभागाचा आढावा या राज्य समितीच्या वतीने घेतला जाणार आहे.

दिनांक २३ फेब्रुवारी ते दिनांक २७ मार्च या कालावधीमध्ये ही समिती राज्यातील सर्वच जिल्ह्यांना भेटी देणार असून पक्ष, दिव्यांग, शेतकरी, युवक, कामगार, महिला, विद्यार्थी आणि सोशल मीडिया या सर्व आघाडीच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्या सोबत बैठका घेतल्या जाणार आहेत.

पक्ष संघटनेची मजबुती, तालुका जिल्हा कार्यकारिणीचा आढावा, स्थानिक प्रश्नांचा पाठपुरावा, पदाधिकारी कार्यक्षमता व बांधिलकी, संघटनात्मक बदल व सुधारणा याबाबत ही समिती आढावा घेऊन पक्षप्रमुख बच्चू कडू यांना अहवाल सादर करणार आहे.

बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली राज्यस्तरीय आढावा व नियोजन समितीमध्ये प्रहार दिव्यांग क्रांतीचे राज्य उपाध्यक्ष तथा पैठण येथील रहिवाशी शिवाजी गाडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# श्री गजानन महाराज प्रगटदिनानिमित्त हजारो भाविकांनी घेतले दर्शन

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
छत्रपती संभाजीनगर
प्रतिनिधी - मोहन आखाडे

**छत्रपती संभाजीनगर :** श्री गजानन महाराजांच्या पावन प्रगटदिनानिमित्त छत्रपती संभाजीनगर येथील श्री गजानन महाराज मंदिरात आज भक्तिभावाने आणि उत्साहात कार्यक्रम साजरा करण्यात आला. पहाटे ४



वाजल्यापासून मंदिरात अभिषेक, पूजा व धार्मिक विधी पार पडले. त्यानंतर दर्शनासाठी हजारो भाविकांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. भाविकांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने रांगेत उभे राहून श्री गजानन महाराजांचे दर्शन घेतले. मंदिर प्रशासन व विश्वस्त मंडळाच्या वतीने दर्शनासाठी भव्य मंडप, सुसूत्र रांग व्यवस्था तसेच उत्कृष्ट नियोजन करण्यात आले होते. त्यामुळे भाविकांना कोणताही त्रास न होता शांततेत दर्शन घेता आले. उन्हाच्या तीव्रतेचा विचार करता भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची, प्रसादाची तसेच आवश्यक सोयी-सुविधांची व्यवस्था करण्यात आली होती. या सर्व व्यवस्थेसाठी विश्वस्त मंडळासह सेवेकरी म्हणून शेकडो भाविकांनी स्वयंसेवक म्हणून सेवा बजावली. प्रगटदिनानिमित्त मंदिर परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला असून, ‘गण गण गणात बोते‘ या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला

# राष्ट्रीय गुणवत्ता नामांकन प्राप्त ग्रामीण रुग्णालय वरिष्ठ अधिकारी यांची भेट

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
मालेगाव - प्रतिनिधी
लकी रोकडे जैन

**मालेगाव :** शहरातील राष्ट्रीय गुणवत्ता नामांकन प्राप्त असलेल्या ग्रामीण रुग्णालयास दिनांक पाच फेब्रुवारीला उपसंचालक अकोला डॉ सुशीलकुमार वाकचौरे तसेच वाशिम जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चव्हाण, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर ठोंबरे यांनी भेट देऊन परिसराची पाहणी केली, याप्रसंगी मालेगाव तालुका ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉक्टर श्रीकांत जाधव, डॉक्टर महेश




शिंदे, डॉक्टर कपिल सुर्वे यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत, वरिष्ठ अधिकारी भेटी दरम्यान परिसराची पाहणी करून समाधान व्यक्त करून काही त्रुटी आढळल्या त्या दुरुस्त करण्यासंदर्भात सूचना दिल्या यावेळी डॉक्टर बोरसे तसेच इतर कर्मचारी व अधिकारी यांची उपस्थिती लाभली होती.



# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात माता रमाई जयंती उत्साहात साजरी

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
अमरावती – प्रतिनिधी
संजय सरवटकर




**अमरावती :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठांतर्गत पाली आणि बुद्धिझम विभागाच्या वतीने आज माता रमाई जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. माता रमाई आंबेडकर यांच्या सामाजिक त्याग, संघर्षमय जीवन आणि स्त्री-मुक्तीच्या कार्याला उजाळा देणाऱ्या या कार्यक्रमास प्राध्यापक, विद्यार्थी व संशोधक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन विद्यापीठाच्या प्रादर्शिक कला विभागात (जुना पाली व बुद्धिझम विभागाजवळ) सायंकाळी करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.डॉ. रेखा वानखडे (पर्वतकर मॅडम) होत्या. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी माता रमाई यांच्या जीवनकार्याचा आढावा घेत स्त्रीशिक्षण, सामाजिक समता आणि संघर्ष याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमास पूज्यनिय भिक्खू अमरावती सीलवंसलंकार, डॉ.मानवटकर सर, डॉ.रजनी गेडाम मॅडम, प्रा.जी.एच.पांडे सर, डॉ. राजेश चौरपगार सर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच प्रा. डॉ. टी. बी. रामटेक सर, प्रा. अनिता निर्गुळे मॅडम, प्रा. कल्पना डोंगरे मॅडम, प्रा. सपना मेश्राम मॅडम, प्रा. कल्पना पाटील मॅडम, प्रा. एस. कुमार मेश्राम सर, प्रा.डॉ.कमलाकर गवर्धन सर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन पाली आणि बुद्धिझम विभागातील विद्यार्थी अभ्यास मंडळाच्या वतीने करण्यात आले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी भीमगीते, बुद्धगीते तसेच माता रमाई यांच्या जीवनावर आधारित कविता व विचार मांडणी सादर करून कार्यक्रमाची शोभा वाढवली. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन विभागातील विद्यार्थ्यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थित मान्यवरांनी पाली आणि बुद्धिझम विभागाचे तसेच विद्यार्थी अभ्यास मंडळाचे विशेष कौतुक केले.

# गोवर्धने महाविद्यालयात वार्षिक स्नेहसम्मेलनानिमित्त 'विविध गुणदर्शन' सोहळा उत्साहात संपन्न

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
इगतपुरी – प्रतिनिधी
विकास पुणेकर



**इगतपुरी :** इगतपुरी येथील मविप्र संचलित कर्मवीर पुंजाबाबा गोवर्धने महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चे वार्षिक स्नेहसंमेलन आणि 'विविध गुणदर्शन' सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे सादरीकरण करत उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन आणि 'महाराष्ट्र गीता'ने करण्यात आला. या सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालय स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संपतराव मुसळे, सदस्य गिरीश मेधने आणि महाविद्यालय विकास समिती सदस्या श्रीमती वैशालीताई आडके उपस्थित होते. तसेच व्यासपीठावर प्राचार्य डॉ.किरण रकिबे आणि स्नेहसंमेलन प्रमुख डॉ.विष्णू राठोड, डॉ.एस.एस.परदेशी, प्रा.राकेश गायकवाड उपस्थित होते.

महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा आपल्या प्रास्ताविकात प्राचार्य डॉ.किरण रकिबे यांनी अहवाल सादर केला. वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक, एन.सी.सी., एन.एस.एस. यासह पर्यावरण आणि जलसुरक्षा जनजागृती मोहिमेत केलेली नेत्रदीपक प्रगती त्यांनी विशद केली. प्राध्यापकांनी संशोधन व शैक्षणिक क्षेत्रात मिळवलेल्या पुरस्कारांचाही त्यांनी आवर्जून उल्लेख केला.

प्रमुख पाहुणे संपतराव मुसळे यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांचे कौतुक करत म्हटले की, 'महाविद्यालयाची ही वाटचाल शैक्षणिक क्षेत्रासाठी नक्कीच अभिमानास्पद आहे.'

सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.कल्पना वाजे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी संगीतवाद्य, गीत, नाट्य, एकांकिका, एकपात्री प्रयोग आणि सामाजिक व राष्ट्रीय जनजागृतीपर विविध कार्यक्रम सादर केले. विद्यार्थ्यांच्या या कलाविष्काराने सोहळ्याला एक वेगळीच उंची प्राप्त करून दिली.

**नियोजन आणि आभार**

या संपूर्ण सोहळ्याचे उत्कृष्ट नियोजन प्राचार्य डॉ.किरण रकिबे व डॉ.विष्णू राठोड यांच्या नेतृत्वाखाली विविध समित्यांनी केले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.बलराम कांबळे यांनी केले, तर डॉ.विष्णू राठोड यांनी उपस्थितांचे आभार मानले.

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी प्रा.कन्हैया चौरेसिया, प्रा.अजय निकम, प्रा.अरुण वाघ, प्रा.सजय फाकटकर तसेच सांस्कृतिक विभागातील विद्यार्थी, सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# हजारो भाविकांनी घेतला श्रींचा उडीदडाळ ज्वारी भाकरीचा महाप्रसाद..

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
जळगाव जामोद प्रतिनिधी
विनोद वानखडे






**जळगांव जामोद :** तालुक्यातील सातपुडा पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या सुनगाव येथील ब दर्जा प्राप्त जागृत ग्रामदैवत श्री आवजीसिध्द महाराज यांचा ७ फेब्रुवारी २०२६ रोजी भंडारा उत्सव साजरा झाला, या भंडाऱ्याची शेकडो वर्षांची परंपरा असून दरवर्षी माघ कृ. षष्टीला श्री आवजीसिध्द महाराज यांचे भंडारा उत्सवाचे आयोजन करण्यात येत असते. येथील भंडारा म्हणजे सुनगावं येथे दिवाळी, दसरा या सणापेक्षा आनंदाचे वातावरण असते श्री आवजीसिध्द महाराज यांचा जन्म रावेर जि. जळगांव खान्देश येथे झाला.

श्री आवजीसिध्द महाराज हे बालपणापासून आंधळे होते सुनगावं येथे श्री महाराजांची मावशी अंबाबाई राहत होती, अशातच ते मावशीकडे सुनगांवला आले असता येथील काही शिवभक्त हे ढवळ्यागिरी येथील यात्रेकरीता जात होते. त्यावेळी त्यांनी मावशी अंबाबाईला या लोकांबाबत विचारले असता त्यांनी अंबाबाईने सांगितले की हे सर्व भक्त लोक शंकराचे यात्रेकरिता जात आहेत,ते भक्तीभावाने शंकराची आराधना केली असता आपल्या मनातील इच्छा पुर्ण होतात. त्यातच आवजीसिध्द महाराज आंधळे असल्यामुळे त्यांनी सुध्दा ढवळ्यागिरी यात्रेकरीता जाण्याचे ठरविले आणि जाताना त्यांनी मावशी अंबाबाईकडे सांगितले की, भोळ्या शंकराने माझ्या मनातील इच्छा पुर्ण केली आणि मी आंधळा असून दृष्टी आली तर मी तेथील उंच कड्ड्यावरून उडी घेईल आणि तेथे ते अंर्तधान पावले त्यांनी मावशी अंबाबाई कडे दिलेल्या सुपारीला बाण फुटले आणि ते बाण म्हणजे सुनगांवचे ग्रामदैवत असलेले श्री आवजीसिध्द महाराज हे होय. आज सुध्दा आपल्या मनातील इच्छा पुर्ण होण्याकरीता दर शुक्रवारी महाराजांच्या दिवसाला बेल माडतात जर आपली इच्छा पुर्ण होत असेल तर एकावर एक ठेवलेले बेल हे महाराजांचे दिशेने पडते आणि आपले कोणतेही काम उशिरा होत असेल तर खाली सुध्दा पडत नाही. त्याला भरमी असे म्हणतात आणि ते जर ज्या भाविक भक्तांने मांडले असेल आणि ते जर त्यांचेकडे पडले तर आपण आपण योजलेली कामे होत नाही याची लोकांना पुर्ण खात्री होते आणि ते काम कोणीच सुरु करीत नाही. अशी येथील श्री आवजीसिध्द महाराजांची आख्यायिका आहे. भंडाऱ्याच्या दिवशी गावामधून भंडाऱ्याची वाजत गाजत मिरणूक काढण्यात येते. त्यामध्ये उडदाच्या दाळीच्या गाड्या, ज्वारीचा आटा तसेच इतर लागणारे सर्व साहित्याचा बैलगाडीने गावापासून आर्धा किमी लांब असलेल्या श्री आवजीसिध्द महाराज यांचे मदिरात नेवून तेथे सर्व गावकरी उडदाची दाळ तसेच स्त्रिया ह्या भाकरी बनवून महाप्रसाद तयार करतात. सदर महाप्रसाद घेण्याकरिता व दर्शनाकरीता पंचक्रोशीतील भाविक भक्त गावातील सासरी असलेल्या मुली तसेच स्त्रीया दर्शनाकरीता येत असतात दिवाळीकरीता न येणाऱ्या मुली ह्या भंडाऱ्याच्या दिवशी येतात ७ फेब्रुवारी २०२६ रोजी तो भंडारा असलेल्या सुनगांव मध्ये उत्सवाचे वातावरण होते. महाराजांची किर्ती दिवसेंदिवस वाढत असून संस्थानचे कार्यही प्रगती पथावर आहे सादर भंडारा यशस्वी होण्याकरीता संस्थांनचे अध्यक्ष सुरेशभाऊ अंबडकार, दिनेश ढगे, व पंच कमिटी, गावकरी मंडळी व सेवाधारी यांनी अथक परिश्रम घेतले सदर भंडाऱ्यामध्ये कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून जळगाव जामोद पोलिसांकडून चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# पत्रकार प्रल्हाद गिरमे राज्यस्तरीय जनसेवा पुरस्काराने सन्मानित

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
जेजुरी – प्रतिनिधी
संदिप रोमण



**जेजुरी :** श्री.क्षेत्र जेजुरी येथील कै.दिनकरराव सावंत स्मृती प्रतिष्ठान व शिवाजीराव यादव राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार समितीच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते, आदर्श शिक्षक व पत्रकार प्रल्हाद गिरमे यांना कै. दिनकरराव सावंत स्मृती प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय जनसेवा पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

हा पुरस्कार महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य सचिव, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य तसेच राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार समितीचे अध्यक्ष प्राचार्य नंदकुमार सागर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी बोलताना प्राचार्य नंदकुमार सागर म्हणाले की, पत्रकार प्रल्हाद गिरमे यांनी पत्रकारिता, शैक्षणिक तसेच सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय व भरीव कार्य केले आहे. पुरंदर तालुक्यात विविध शिक्षक संघटनांचे प्रसिद्धी प्रमुख म्हणून त्यांनी केलेले कार्य अत्यंत कौतुकास्पद असून, त्यांच्या या योगदानाची दखल घेऊन त्यांना राज्यस्तरीय जनसेवा पुरस्कार देण्यात आला आहे.

कार्यक्रमावेळी कै. दिनकरराव सावंत स्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष संजय सावंत यांनीही मनोगत व्यक्त करताना सांगितले की, प्रल्हाद गिरमे यांनी शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कार्य केले असून समाजासाठी त्यांचे योगदान प्रेरणादायी आहे.

# सिद्धार्थ नवयुवक मित्र मंडळाच्या वतीने माता रमाई जयंती उत्साहात साजरी

दै.चालु वार्ता वृत्तसेवा
डोणगाव – प्रतिनिधी
सालार बेग



**डोणगाव :** वार्ड क्रमांक १ येथील सिद्धार्थ नवयुवक मित्र मंडळाच्या वतीने 'त्यागमूर्ती' माता रमाई आंबेडकर यांची जयंती अत्यंत उत्साहात व भक्तीमय वातावरणात साजरी करण्यात आली. दीन-दलितांच्या उद्धारासाठी आयुष्य वेचणाऱ्या व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संघर्षात खंबीरपणे साथ देणाऱ्या माता रमाई यांना यावेळी विनम्र अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात माता रमाई आंबेडकर व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून तसेच दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी मंडळाचे कार्यकर्ते व परिसरातील नागरिकांनी माता रमाईच्या प्रतिमेला अभिवादन करून त्यांच्या कार्याचा गौरव केला. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून अरुण भाऊ धांडे, राज वाठोरे सर, निलेश सदावर्ते, संदीप बोरकर, रोहित वाघमारे, संदीप वाकोडे, पवन खोडके, उज्वल साळवे आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच महिला मंडळाच्या आशाबाई सदावर्ते, लक्ष्मीबाई दिपके, सविता गवई, जयश्री ताई गवई, अर्चना साळवे, रंजना पनाड, आशाबाई भारशंकर यांच्यासह महिला व बालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रम शांततापूर्ण व प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

(पान १ वरून...)

## काँग्रेसने २४ तासांत दलित समुदायाची माफी...

आम आदमी पक्षाने त्यांचा सन्मान केला आणि त्यांना मंत्री केले. परंतु आज प्रताप सिंग बाजवा यांनी त्यांच्याविरुद्ध अत्यंत अपमानास्पद भाषा वापरली आहे, जी संपूर्ण दलित समुदायाचा अपमान आहे. चीमा यांनी स्पष्टपणे सांगितले की काँग्रेस पक्ष हा दलितविरोधी पक्ष आहे.

काँग्रेस पक्षाकडून सर्व दलित मंत्र्यांना लक्ष्य केले जात आहे. कधी ते वेगवेगळ्या सबबी सांगतात, कधी नाव घेऊन, तर कधी त्यांना मटेरियल म्हणून हिणवतात. आता तर त्यांनी हरभजन यांना बजानेवाले (वाजवणारे) असे म्हणून आक्षेपार्ह टीका केली आहे. दलितांविरुद्ध अशी भाषा वापरणे अत्यंत लज्जास्पद आहे. जातीचे नाव घेऊन आक्षेपार्ह भाष्य करणे त्यांना शोभत नाही. चीमा यांनी प्रताप सिंग बाजवा आणि संपूर्ण काँग्रेस पक्षाने २४ तासांच्या आत दलित समुदायाची माफी मागावी अन्यथा कठोर कारवाई करावी अशी कडक मागणी केली. हा पंजाबमधील दलित समुदायाचा घोर अपमान आहे. अशाप्रकारे पंजाबमधील कष्टकरी विद्यार्थ्यांना पुढे येण्यापासून परावृत्त करणे हे निराशाजनक आहे असे ते म्हणाले.

---

## सुनील तटकरेंचे सूर बदलले...

देत म्हटले की, आमच्या पक्षातील निर्णय घेण्याचा अधिकार आम्हाला आहे. त्यांनी आमच्या पक्षाबाबत बोलू नये. रामदास कदम यांनी 'मातोश्री' का सोडली, अन्य लोकांची साथ का दिली हे आम्ही त्यांना विचारले नाही.

**सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्रिपदाचा कार्यभार घेणार**

सुनेत्रा पवार या मंत्रिमंडळाच्या बैठकीसाठी १० फेब्रुवारीला मुंबईत येणार आहेत. त्यावेळी त्या उपमुख्यमंत्रिपदाचा कार्यभार घेण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांची बैठक देखील त्या त्याच दिवशी घेणार असल्याची माहिती आहे.

---

## ज्याची भीती होती तेच घडलं !

खोटे आरोप केले जात आहेत. आम्ही अमेरिकेकडून करण्यात येणाऱ्या या खोट्या आरोपांचा तीव्र शब्दात निषेध करतो, शस्त्रास्त्र वाढवण्याच्या स्पर्धेत जर कोणी दोषी असेल तर त्यामध्ये अमेरिका पहिल्या स्थानावर आहे, असं चीनने म्हटलं आहे, दरम्यान चीनने दिलेल्या प्रत्युत्तरानंतर आता अमेरिका आणि चीनमधील संघर्ष आणखी वाढण्याची शक्यता आहे. चीनकडून अमेरिकेचा हा दावा फेटाळून लावण्यात आला आहे.




(पान १ वरून...)

## भारत-पाकिस्तान 'क्रिकेट' वादात ...

**सामना होणार? आशा कायम...**

आयसीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) सँग गुप्ता यांनी श्रीलंका क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष शाम्मी सिल्वा यांची भेट घेतली आहे. जरी परिस्थिती तणावपूर्ण असली, तरी एका आयसीसी संचालकाने दिलेल्या माहितीनुसार, पाकिस्तान बोर्डाने आता चर्चेसाठी तयारी दर्शवली आहे. त्यामुळे भारत-पाकिस्तान हा हाय-प्रोफाईल सामना नियोजित वेळेत पार पडेल, अशी आशा क्रिकेट विश्वाला आहे.

# जाहिर सूचना

दिनांक : ०९/०२/२०२६

नमस्कार,

दै चालु वार्ता कडून जाहीर करण्यात येथे की जर आमचा म्हणजेचं दै चालु वार्ताचा प्रतिनिधी आहे म्हणून कोणी दावा करत असेल तर त्याचं ID कार्ड पाहू शकता किंवा नियुक्ती लेटर सध्या जे आमचे पत्रकार आहेत त्याच्याकडे चालू कालावधीचे ID कार्ड किंवा नियुक्ती लेटर असतं तेंच आमचे पत्रकार आहेत. (कालावधी संपलेले ID किंवा नियुक्ती लेटर असेल आणि ते दै चालु वार्ताचा प्रतिनिधी असल्याचा दावा करत असतील तर ते खोटं आहे. तर आपण आमच्या कार्यालयात खालील नं वर संपर्क करू शकता.) जर कालावधीच्या आतील त्यांच्याकडे ID किंवा नियुक्ती लेटर नसेल तर ते सध्या आमचे म्हणजे दै चालु वार्ताचे अधिकृत पत्रकार नाहीत. जरी त्यांच्या पेपरला बातम्या लागत असतील तरीही ते अधीकृत नाहीत (बातम्या पत्रकारच्या नावानी त्यांनी केलेल्या विनंती मुळे लावल्या जातात.)

**टीप :** दै चालु वार्ताच नियुक्ती लेटर किंवा ID ओरिजिनल आहे कसं कळणार. ओरिजिनल ID व नियुक्तीलेटर वर युन्कि रेफरन्स नं आहे जों Ref पासून सुरु होतो.

कार्यालय : हांडेवाडी रोड, हडपसर पुणे – ४११०२८. मो ९३७३५०४७४८

This Daily Printed, Published and Owned by **Dnyanoba Sudhakar Lokhande Patil** Printed at Girish Printers and Paper Converters, 150, Shaniwar Peth, Near Amruteshwar Mandir, Pune (M.S.)-411030 and Published at Flat No.806, 8 th Floor, Ratan Neptune, Handewadi Road, Hadapsar, Pune (M.S.)-411028 ■ **Editor : Dnyanoba Sudhakar Lokhande Patil** ■ Mob No.: **9373504748** ■ Email **dainikchaluwartha@gmail.com** ■ RNI No.: MAHMAR/2021/82895 (JURISDICTION AT PUNE)

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक **श्री.ज्ञानोबा सुधाकर लोखंडे पाटील** यांनी गिरीष प्रिंटर्स अँड कन्व्हर्टर्स, १५०, शनिवार पेठ, अमृतेश्वर मंदिराजवळ, पुणे (महाराष्ट्र)– ४११०३० येथे छापून फ्लॅट नं.८०६, ८ वा मजला, रतन नेपच्युन, हंडेवाडी रोड, हडपसर, पुणे (महाराष्ट्र)–४११०२८ येथून प्रकाशित केले. ■ **संपादक – श्री.ज्ञानोबा सुधाकर लोखंडे पाटील** ■ मो.नं.**9373504748** ■ Email - **dainikchaluwartha@gmail.com** ■ RNI No.: MAHMAR/2021/82895 (सर्व वाद पुणे न्याय कक्षेत)